EPW

# उन्मादाचं राजकारण

*गोरखालँडचा प्रश्न सोडवण्यासाठी पश्चिम बंगाल सरकारने राजकीय संवादाची प्रक्रिया सुरू करायला हवी.*

सक्रिय लोकशाहीची प्रक्रिया राजकारणातील जनतेच्या सहभागातून उगम पावत असते. परंतु उन्माद मात्र लोकशाहीला धोकादायक असतो. लोकशाही राजकारणासाठी माहीतगार नागरिक असावे लागतात. याउलट उन्मादानं अविचारीपणा फोफावतो. सध्या भारतीय राजकारणाला चालना देणारे कळीचे शब्द उन्मादाचेच आहेत. गोहत्या, लव्हजिहाद, काळा पैसा आणि त्याउपर 'फुटीरतावाद' असे हे सध्या जोरकसपणे वापरात असलेले शब्द आहेत. राजकीय स्वायत्ततेच्या दाव्यांविषयी खुल्या मनानं चर्चा करण्याची शक्यताही 'फुटीरतावाद' या शब्दानं नाकारली जाते. पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्यात सध्या सुरू असलेला संघर्षही लोकशाही संवादाचा अवकाश आकुंचन पावल्याचंच सिद्ध करतो आहे.

आठ जून रोजी पश्चिम बंगालच्या मंत्रिमंडळाची बैठक दार्जिलिंगमध्ये होत असताना गोरखा जनमुक्ती मोर्चा या संघटनेनं प्रचंड मोठ्या निदर्शनांचं आयोजन केलं होतं. गेल्या ४५ वर्षांमध्ये पहिल्यांदाच राज्याच्या मंत्रिमंडळाची बैठक या पहाडी शहरात होत होती. राज्यभरातील शाळांमध्ये बंगाली भाषा अनिवार्य करण्याचा ममता बॅनर्जी यांचा निर्णय या निदर्शनांना निमित्त देणारा ठरला. वास्तविक, हा निर्णय नेपाळीभाषकांचं प्रभुत्व असलेल्या पहाडी प्रदेशामध्ये लागू होणार नाही, असं बॅनर्जी यांनी दार्जिलिंगमधील मंत्रिमंडळाच्या बैठकीपूर्वीच स्पष्ट केलेलं होतं. परंतु भाषेच्या प्रश्नानं तोपर्यंत गोरखालँडच्या मागणीचं पुनरुज्जीवन केलं होतं. याला सरकारनं सशस्त्र बळानं प्रत्युत्तर दिलं. निदर्शनं दडपण्यासाठी पोलीस आणि निमलष्करी दलांसोबतच सैन्यालाही पाचारण करण्यात आलं.

पश्चिम बंगालच्या 'प्रादेशिक ऐक्या'साठी सशस्त्र हस्तक्षेप गरजेचा होता, असा युक्तिवाद तृणमूल काँग्रेसच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारनं केला. यातून लोकउन्मादानं उसळी खाल्ली. आक्रमक बंगाली अस्मिता असलेल्यांनी दार्जिलिंगची तुलना घाईगडबडीनं काश्मीरशी करून टाकली. ही दोन्ही 'फुटीरतावादा'ची उदाहरणं असल्याचं सांगण्यात आलं. काश्मीरमधील स्वयंनिर्णयाची चळवळ स्वतंत्र राष्ट्रीयत्वासाठीची आहे, तर गोरखालँडची चळवळ भारतामध्येच स्वायत्त राज्यासाठीची आहे, ही स्पष्ट वस्तुस्थितीही या उन्मादामध्ये झाकोळली गेली. या सहेतूक विसराळूपणाला कोलकात्यामधील प्रसारमाध्यमांनी आणखी चालना दिली. काश्मीरमधील आंदोलनावर पोलादी कठोरपणे कारवाई करणारं केंद्र सरकार उत्तर बंगालमधील हिंसाचार नियंत्रणात आणण्यासाठी काहीच करत नाही हा केंद्र सरकारचा 'दुटप्पीपणा' आहे, अशी टीका माध्यमांमधील प्रभावशाली घटकांनी केली. हे तर्कदुष्ट युक्तिवाद आहेत. लोकचळवळींना क्रूरपणे दडपल्यास त्यांना तात्पुरतं थोपवलं जातं, पण मूळ मुद्दा मात्र सुटत नाही, हा मुद्दा सामूहिकरित्या

दुर्लक्षिण्याची आपली सवय यातून टिकून राहाते.

गोरखा जनमुक्ती मोर्च्याच्या दाव्यांचं मूल्यमापन केल्याशिवाय सरकारनं त्या मागण्या मान्य कराव्यात, असं नाही. या चळवळीद्वारे वांशिक-भाषिक अस्मितेला चेतवण्याचा प्रयत्न आहे आणि अशा अस्मितेचा आधार तपासणंही तितकंच महत्त्वाचं आहे. इतिहासज्ञ लिओनेल कॅप्लान म्हणतात त्याप्रमाणे, 'गोरखा' (किंवा 'गुरखा') या संज्ञेचं मूळ वसाहतवादी 'लढाऊ वंशा'च्या सिद्धान्तामध्ये शोधता येतं. या सिद्धान्ताद्वारे सैनिकी भरतीसाठी विविध वांशिक-भाषिक समुदायांना 'लढाऊ वंश' या गटामध्ये एकत्र आणण्यात आलं. यातून या संज्ञेच्या वैधतेला तडा जातो का? सांस्कृतिक, धार्मिक, भाषिक, वांशिक, राष्ट्रीय- अशा सर्वच सामुदायिक ओळखी/अस्मिता निःसंशयपणे ऐतिहासिक स्वरूपात उत्पादित झालेल्या असतात. आज आपण ज्या ओळखींशी जोडून घेतो त्यातील अनेकांची घडण तर वसाहतवादी संपर्कातून झालेली आहे. बंगाली भद्रलोकांची अस्मिता (ही उघडपणे ब्रिटनमधील व्यावसायिक मध्यवर्गांच्या धर्तीवर आधारलेली होती) वैध ठरत असेल, तर या भद्रलोकांच्या उत्तर बंगालमधील राजकीय वर्चस्वाला आव्हान देणाऱ्या गोरखा अस्मितेला वैध का मानू नये?

वास्तविक, गोरखा जनमुक्ती मोर्चा कोणाचं प्रतिनिधित्व करू इच्छितो आणि कोणाला वगळतो, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. गोरखा हे कोणत्याही अर्थी उत्तर बंगालातील एकमेव वांशिक गट नाहीत. इतर वांशिक गटांचं प्रतिनिधित्व गोरखा जनमुक्ती मोर्चा किती प्रमाणात करतो? शिवाय, दार्जिलिंगमध्ये गोरखा बहुसंख्याक आहेत, परंतु गोरखालँडमध्ये सिलिगुडी शहरासह इतरही पहाडी व मैदानी प्रदेशांचा समावेश करण्याची मागणी गोरखा जनमुक्ती मोर्चानं केलेली आहे. या प्रस्तावित राज्यातील गोरखेतर समुदायांना कशा प्रकारे सामावून घेतलं जाईल, या प्रश्नाचं उत्तर गोरखा जनमुक्ती मोर्चानं द्यायला हवं. परंतु हे खुल्या लोकशाही संवादातूनच शक्य आहे. 'प्रादेशिक ऐक्या'चा उन्मादी बचाव करत किंवा बळाचा वापर करून हे घडणार नाही.

पश्चिम बंगालच्या प्रादेशिक ऐक्याबाबतची निष्ठा वारंवार उघडपणे दाखवत राहिल्यास तृणमूल काँग्रेसला राज्यात इतरत्र पाठिंबा कमावता येईल, या विश्वासापोटी राज्य सरकार सातत्यानं बळाचा वापर करतं आहे. बंगालच्या १९०५ आणि १९४७ या वर्षांमधल्या फाळणीच्या स्मृतींपासून गोरखालँड चळवळीचं भूत या राज्याच्या मानगुटीवर कायम आहे. राज्याच्या 'विच्छेदना'च्या कोणत्याही मागणीबाबत अजिबात तडजोड न करण्याची आपली भूमिका आहे, असं दाखवत स्वतःची बंगाली सांस्कृतिक अस्मितेचा पाठीराखा ही प्रतिमा ठसवण्याचा तृणमूल काँग्रेसचा प्रयत्न आहे. पश्चिम बंगालच्या राजकारणात पाय पसरवण्यासाठी हिंदुत्वाचा वापर करण्याची व्यूहरचना भारतीय जनता पक्ष (भाजप) आखत आहे, त्याला प्रतिकार करण्याचाही तृणमूलचा प्रयत्न यातून दिसतो.

राजकीय अशांततेमुळं उत्तर बंगालातील आर्थिक जीवन ठप्प झालं आहे. तरीही, या घडामोडींमधून तृणमूल काँग्रेसला निवडणुकांमध्ये कदाचित अल्पकालीन लाभ होईल. (गोरखालँडच्या मागणीबाबत अशाच प्रकारची भूमिका घेतलेल्या) डाव्या आघाडीच्या सरकारप्रमाणे तृणमूल काँग्रेसलाही बंगाली सांस्कृतिक दुराभिमानाला चुचकारण्याचं महत्त्व माहीत आहे. या मुद्द्यावरील भाजपची दोलायमान भूमिकाही सूचक आहे. आधी भाजपनं गोरखालँड चळवळीविषयी सहानुभूती व्यक्त केली होती. परंतु, बंगालच्या राजकारणासंदर्भातील पक्षाच्या आकांक्षा वाढीला लागल्यानंतर या

भूमिकेनं निरनिराळी वळणं घेतली. भाजपच्या दार्जिलिंग शाखेनं गोरखालँडच्या मागणीला समर्थन दिलं आहे; पश्चिम बंगाल राज्य शाखेनं या मागणीला विरोध केला आहे; तर केंद्र सरकारनं आंदोलन चिरडण्यासाठी सैनिकी मदत पुरवली आहे. या गुंतागुंतीमध्ये आणखी भर टाकत सिक्कीमचे मुख्यमंत्री पवनकुमार चमलिंग यांनी गोरखालँडला उघडपणे समर्थन दिलं आहे. परंतु, अखेरीस 'फुटीरतावादा'वरून जनउन्मादाला खतपाणी घालणं आपल्या लोकशाहीच्या आरोग्यालाच घातक ठरणार आहे.

संवाद सुरू न करण्याचं कारण देताना दोन्ही बाजूंकडून हिंसाचाराचा वापर अनेकदा केला जातो. वातावरण शमवण्याची जबाबदारी राज्य सरकारवर आहे. संपूर्ण पश्चिम बंगालनं लोकशाही मार्गानं निवडून दिलेल्या मुख्यमंत्री म्हणवणाऱ्या ममता बॅनर्जी यांनी जनउन्मादाचं राजकारण खेळण्याऐवजी राजकीय संवादाची प्रक्रिया सुरू करायला हवी. ●

---

## जुनैदच्या हत्येचा निराळा संदर्भ

*द्वेषाच्या राजकारणाविरोधातील प्रत्येक निषेधाचं स्वागत करावं अशी सध्याची स्थिती आहे.*

गोहत्येच्या संशयावरून एखाद्या व्यक्तीला जमावानं जीव मारल्याच्या वीसहून अधिक घटना गेल्या सहा महिन्यांमध्ये घडल्या आहेत. परंतु, बावीस जून रोजी दिल्लीहून मथुरेला जाणाऱ्या ट्रेनमध्ये पंधरा वर्षीय जुनैद खान याचा दिवसाढवळ्या खून करण्यात आल्यानंतर उमटलेल्या प्रतिक्रिया आधीच्या घटनांच्या तुलनेत अधिक तीव्र असल्याचं दिसतं आहे. जुनैद वयानं लहान होता, किंवा ईदसाठी खरेदी करून तो घरी परतत होता, एवढ्याच कारणामुळं या प्रतिक्रिया उमटल्या, असं नाही. कोणालाही हानी न पोचवलेल्या या तरुण मुलाची हत्या केवळ तो मुस्लीम होता आणि तो मुस्लीम असल्याचं सहज ओळखू येत होतं, या एकमेव कारणावरून झाली, हा मुद्दा भावनांना हात घालणारा ठरला असावा. जुनैदच्या हत्येचा हा अतिशय चिंताजनक सूचकार्थ आहे: पवित्र गायीबद्दलचं प्रेम दाखवण्याचा मार्ग म्हणून अधिकृतरित्या द्वेषाला प्रोत्साहन देणाऱ्या भारतामध्ये कोणत्याही मुस्लीम व्यक्तीला केवळ तिच्या भिन्न पेहरावावरून हल्ल्याला सामोरं जावं लागू शकतं. गायीच्या नावावरून जमावाकडून हत्या होण्यास सुरुवात झाली तेव्हा भविष्यात या घडामोडींना हे वळण मिळणार असल्याचं स्पष्ट झालं होतंच. गाय दिसतही नसली तरी गोमांस खाल्ल्याचा कल्पित संदर्भ कोणालाही लक्ष्य करण्यासाठी, हिणवण्यासाठी आणि जीव घेण्यासाठीही पुरेसा ठरू लागला आहेत.

जुनैदच्या हत्येमधून अनेक धडे घेण्यासारखे आहेत. इतर कोणत्याही सर्वसामान्य भारतीयाप्रमाणे तो आपल्या भावांसोबत खरेदी करून ट्रेननं प्रवास करत होता- स्वतःच्या कामाशी काम ठेवून होता. पण त्याला असं साधं जगण्याचीही परवानगी नव्हती. जागा पकडण्यावरून सुरू झालेल्या 'भांडणा'चं रूपांतर द्वेषगुन्ह्यामध्ये झालं. जुनैद व त्याच्या भावांना 'गोमांसभक्षक' म्हणून चिडवण्यात येऊ लागलं, त्यांना 'पाकिस्तानी' संबोधण्यात आलं, त्यांच्या डोक्यावरच्या टोप्या खेचण्यात आल्या, एका भावाची दाढी ओढण्यात आली आणि नंतर जमावानं त्यांच्यावर हल्ला चढवला, त्यांना मारहाण केली आणि अखेरीस त्यांच्यावर

चाकूनं वार केले. अशा प्रकारच्या इतर हल्ल्यांमध्ये मारेकरी स्वतःला गोरक्षक म्हणवून घेतात, पण जुनैदच्या हत्येमध्ये एकसंध गट सहभागी झालेला नव्हता, तर मुस्लिमांविषयीच्या द्वेषातून एकत्र झालेल्या व्यक्तींनी केलेला हा गुन्हा होता. गर्दीनं भरलेल्या त्या डब्यातील एकाही व्यक्तीनं हल्लेखोरांना थांबवण्याचा प्रयत्न केला नाही, हेही लक्षणीय आहे. याहून वाईट म्हणजे जुनैदला आणि त्याच्या भावांना ट्रेनमधून बाहेर ढकलण्यात आल्यावर रक्तबंबाळ अवस्थेतला जुनैद रेल्वेफलाटावर पडला होता, परंतु सुमारे दोनशे लोकांच्या गर्दीतील एकानंही त्याला मदत केली नाही, किंवा रुग्णवाहिकेला वा पोलिसांना बोलावलंही नाही. हे मौन तोडण्याची गरज आहे, लोकांच्या जीवनात पसरलेल्या द्वेषाला आणि गुन्ह्यातील अशा सहभागाला थांबवण्याची गरज आहे, अन्यथा भविष्यात इतरही अनेक जुनैद अशाच प्रकारे बळी पडण्याची भीती आहे.

भारतात २८ जून रोजी डझनभर ठिकाणी 'नॉट इन माय नेम' या घोषवाक्यासोबत रस्त्यावर उतरलेल्या निदर्शकांनी हे मौन तोडण्याचा प्रयत्न केला. साहजिकपणे या निदर्शकांना शहरी, उच्चभ्रू आणि अपरिणामकारक म्हणून दुर्लक्षिण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु या निदर्शनांमधील सहभागी लोकांची संख्या किंवा त्यांचा गट या बाबी महत्त्वाच्या नाहीत, तर कोणत्याही राजकीय पक्षाच्या पाठबळाशिवाय उत्स्फूर्तपणे लोक निदर्शनांसाठी जमले आणि लोकशाहीमध्ये निषेध व्यक्त करण्याचा नागरिकांचा अवकाश त्यांनी हक्कानं मागितला, हा मुद्दा महत्त्वाचा आहे. केवळ मुस्लिमांची हत्या झाल्यावरच हे लोक निषेध का करतात, शेतकऱ्यांची हत्या झाल्यावर ते निषेध का करत नाहीत, काश्मिरी पोलिसाची हत्या झाल्यावर ते निषेध का करत नाहीत, दलितांच्या सामूहिक हत्या होतात तेव्हा हे लोक निषेध का करत नाहीत, असे अनेक प्रश्न विचारले जात आहेत. यातील काही प्रश्न उचित असले, तरी मुळात आत्तापर्यंत शांत बसलेले लोक आता रस्त्यावर उतरू लागलेत आणि बोलू लागलेत ही वस्तुस्थितीच जास्त महत्त्वाची आहे. निषेधाचं महत्त्व आणि मतभिन्नतेची समयोचितता यातून अधोरेखित होते आहे आणि यातून ऐक्य उभारण्याची गरजही दिसते आहे.

हिंदूराष्ट्र स्थापनेच्या अंतिम ध्येयाकडं क्रूर निर्धारानं वाटचाल करणाऱ्या भारतीय जनता पक्ष व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांना हातात फलक घेतलेल्या मोजक्या व्यक्तींमुळं काहीही फरक पडणार नाही, हे शक्य आहे. अशा वेळी राजकीय विरोधाची विखंडित व निराशाजनक अवस्था पाहाता व्यापक राजकीय प्रतिसाद दिला जाण्याची गरज आहे. दलित, शेतकरी व इतर वंचित समुदायांकडून झालेली निदर्शनं महत्त्वाची आहेत आणि बदल घडवण्यासाठी त्यांनी एकत्र येण्याची गरज आहे. अर्थात, निदर्शनाची किंवा मतभिन्नतेची समयोचितता यशस्वी राजकीय परिणामावर विसंबून राहू शकत नाही. लोकशाहीमध्ये आणि हुकूमशाहीमध्येही लोक बोलू पाहातात, कारण राज्यसंस्था आपली मुस्कटदाबी करत असली तरी आपण बोलणं गरजेचं आहे असा विश्वास त्यांना वाटत असतो.

भारतातील सद्यस्थितीमध्ये हिंदू भारताची दृष्टी आपल्यावर लादली जात आहे, असं वाटणाऱ्या आणि अशा सक्तीशी असहमत असलेल्या नागरिकांना आक्षेप नोंदवण्यासाठी अनेक निमित्तं आहेत. ही दीर्घकालीन योजना अतिशय पद्धतशीरपणे अंमलात आणली जाते आहे, त्यामुळं संघ परिवाराचा भाग नसतील अशा बाकीच्या सर्वसामान्य हिंदूंनाही इतर समुदायांविषयीचा– आणि विशेषतः मुस्लिमांविषयीचा– द्वेष वैध असल्याचं

वाटू लागलं आहे. जुनैदच्या हत्येबाबतचा हा मुद्दा अधिक लक्ष देण्यासारखा आहे: एखाद्या समुदायावर खलप्रवृत्तीचा शिक्का मारून त्या समुदायातील सदस्यांविरोधात सुट्या व्यक्तीही कोणतं तरी निमित्त साधून हल्ला करू शकतात. दैनंदिन पातळीवर द्वेषाच्या राजकारणाला प्रोत्साहन दिलं जातं आहे, त्यामुळं कायद्याचं पालन करणाऱ्या नागरिकांना त्यांच्या जीवाची व पोराबाळांची भीती सतावू लागली आहे. गतकाळामध्ये शिखांना अशा प्रकारे लक्ष्य करण्यात आलेलं आहे, दलितांना नेहमीच अशा द्वेषाला बळी पडावं लागतं, ईशान्य भारतातील लोकांना त्यांचं 'भारतीयत्व' विश्वासार्ह असल्याचं सातत्यानं सिद्ध करावं लागतं, काश्मिरी लोक त्यांच्या राज्याबाहेर गेल्यावर त्यांना ते 'दहशतवादी' नसल्याचं सिद्ध करण्याची सक्ती केली जाते आणि आता मुस्लिमांना 'गोमांसभक्षक' म्हणून अलग पाडलं जातं आहे. याचा प्रतिकार होण्याची गरज आहे आणि सर्व प्रकारचे प्रतिकार या परिस्थितीत स्वागतार्ह ठरतात. सार्वजनिक अनास्था आणि अमानवता यांच्यावर क्रौर्याची इमारत उभी राहते. मतभिन्नता असलेल्या लोकांनी काहीच केलं नाही, तर मात्र हिंदूराष्ट्राची निर्मिती अपरिहार्य वास्तव बनेल. ●

---

## गजाआडचं स्वातंत्र्य

*महिला कैद्यांना पितृसत्ताक पूर्वग्रहांची झळ सहन करावी लागते.*

मुंबईतील भायखळा इथल्या महिला तुरुंगामध्ये २४ जून रोजी एका ३८ वर्षीय कैद्याचा मृत्यू झाला. यातून भारतातील सर्वच तुरुंगांची दुरवस्था आणि खासकरून महिला कैद्यांना व आरोपींना सहन करावं लागणारं लिंगभावाधारित क्रौर्य हे मुद्दे पुन्हा प्रकाशात आले. अपुऱ्या कर्मचारीवर्गामुळं वॉर्डनचं काम देण्यात आलेल्या मंजुळा शेट्ट्ये यांनी आपल्या बराकीतील इतर कैद्यांना अपुऱ्या प्रमाणात अंडी व ब्रेड दिले जात असल्याबद्दल महिला तुरुंगाधिकाऱ्याशी वाद घातला, यानंतर शेट्ट्ये यांना झालेल्या मारहाणीत त्यांचा मृत्यू झाला. सरकारी जे. जे. रुग्णालयातील डॉक्टरांनी केलेल्या शवविच्छेदनाच्या अहवालात म्हटल्यानुसार शेट्ट्ये यांच्या शरीरावर मुक्या माराच्या अनेक खुणा होत्या आणि त्यांचा मृत्यू मारहाणीमुळंच झाला. पोलिसांनी दाखल केलेल्या प्राथमिक माहिती अहवालामध्ये एका सहकैद्याची प्रत्यक्षदर्शी साक्ष नोंदवण्यात आली आहे. शेट्ट्ये यांना तुरुंगाच्या कर्मचाऱ्यांनी क्रूरपणे मारहाण केलीच, शिवाय तीन महिला हवालदारांनी त्यांच्यावर लैंगिक अत्याचारही केले, असं या साक्षीत म्हटलं आहे. या संदर्भात तुरुंगातील सहा कर्मचाऱ्यांवर ठपका ठेवण्यात आला असला, तरी कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.

तुरुंगाआड जिणं जगत असलेल्या महिलांना समाजाबरोबरच त्यांच्या कुटुंबियांकडून आणि तुरुंगातील कर्मचाऱ्यांकडून अतिशय घृणास्पद पितृसत्ताक पूर्वग्रहांचा सामना करावा लागतो. महिला तुरुंगवासींबाबत भारतीय कुटुंबं अधिक कठोरपणे वागतात आणि क्षमाशीलता दाखवत नाहीत, परिणामी निकटवर्तीयांकडून त्यांच्या फारशा भेटीगाठीही घेतल्या जात नाहीत, त्यांना कायदेशीर सहाय्य मिळवण्यासाठी कुटुंबाकडून फारशी आर्थिक मदतही होत नाही (बहुतांश महिला कनिष्ठ आर्थिक स्तरातील असतात), असं संशोधन-अभ्यासांमधून दाखवून देण्यात आलं आहे. त्यामुळं त्यांना

अत्याचाराबद्दल वाच्यता करणंही अशक्य बनत जातं आणि टाकून देण्यात आलेल्या या महिला तुरुंगातील कर्मचाऱ्यांच्या कृपेवर अवलंबून राहातात.

देशभरातील बहुतांश तुरुंगांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त कैदी भरलेले आहेत, स्वच्छतेच्या सुविधांची परिस्थिती वाईट आहे आणि खाताही येणार नाही असं जेवण तिथं देतात, पण महिला कैद्यांची परिस्थिती याहून वाईट असते. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या आकडेवारीनुसार, २०१४ साली देशात १६,९५१ महिला कैदी होत्या, आणि १,३९४ तुरुंगांपैकी २० तुरुंग पूर्णपणे महिलांसाठीचे आहेत. एकूण कैद्यांपैकी ११ हजारांहून थोड्या जास्त संख्येनं महिलांच्या प्रकरणांची सुनावणी सुरू आहे. बहुतांश स्त्रिया १८–५० वर्षे वयोगटातील आहेत. अनेक सरकारी समित्यांनी तुरुंगांमध्ये सुधारणा करण्यासाठी शिफारसी केल्या असल्या, तरी या सुधारणांचा मुख्य भर पुरुष कैद्यांवर होता. महिलांच्या विशिष्ट गरजांकडं पुरेसं लक्ष देण्यात आलेलं नाही. उदाहरणार्थ, महिला कैद्यांना मासिक पाळीच्या वेळी प्राथमिक सुविधा पुरवणं गरजेचं असतं. गरोदर महिला व स्तनपान देणाऱ्या महिलांच्याही भिन्न गरजा असतात. या गरजांचा विचार झालेला नाही. महिला कैदी आजारी पडल्यावर औषधांसाठी त्या बहुतेक वेळा कुटुंबियांवर आणि मैत्रिणींवर विसंबून असतात. अनेक महिला कैदी त्यांची मुलं सहा वर्षांची होईपर्यंत स्वतःसोबत ठेवू शकतात. त्यांना पोषणासाठी व शिक्षणासाठी अत्यल्प सुविधा उपलब्ध असतात, त्यामुळं वाईट परिस्थिती आणखी बिघडत जाते.

स्त्री व पुरुष दोन्हींचा समावेश असलेल्या सर्वसाधारण तुरुंगांमध्ये महिलांना स्वतंत्र विभागांमध्ये ठेवलं जातं, तिथं ग्रंथालयांसारख्या सुविधा क्वचितच असतात. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या आकडेवारीनुसार, एकूण महिला कैद्यांपेक्षा २५ टक्क्यांहूनही कमी संख्येनं महिला कर्मचारी वर्ग देशातील तुरुंगांमध्ये आहे. महिला कैद्यांच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी भारत सरकारनं १९८८ साली न्यायमूर्ती कृष्ण अय्यर समितीची नियुक्ती केली. 'महिला व बाल गुन्हेगारांना हाताळण्यातील विशेष भूमिका' लक्षात घेता पोलीस दलामध्ये आणखी महिलांची भरती करावी, अशी शिफारस या समितीनं केली होती. परंतु, शेट्टे यांच्यावर महिला अधिकाऱ्यांनीच अत्याचार केल्याचा आरोप आहे. पोलीस वा तुरुंग अधिकाऱ्यांचं लिंग त्यांच्या प्रशिक्षणाइतकं वा संवेदनावृद्धीइतकं महत्त्वाचं ठरत नाही. आपल्या कृतींबद्दल उत्तरदायी ठेवणारी यंत्रणाही तितकीच महत्त्वाची आहे. महाराष्ट्रात केवळ महिलांसाठीचे दोन तुरुंग आहेत आणि देशातील महिलांसाठीचं पहिलं खुलं कारागृहही महाराष्ट्रात आहे. या पार्श्वभूमीवर सर्वसाधारणपणे पुरोगामी प्रतिमा असलेल्या या राज्यात इतर राज्यांच्या तुलनेत तुरुंगातील मृत्यू 'थोडेसे जास्त' असतात, असं केंद्रीय गृहराज्य मंत्री किरेन रिज्जू यांनी २१ मार्च रोजी लोकसभेत सांगितलं. उत्तरादायी राखणारी यंत्रणा अस्तित्त्वात नसणं, हे यामागील कारण आहे.

सर्वसाधारणपणे तुरुंगांमधील सुधारणा आणि खासकरून महिला कैद्यांविषयीच्या सुधारणा कोणत्याही सरकारच्या प्राधान्यक्रमावर नाहीत. तुरुंगांमध्ये बहुतेकदा अपुरा कर्मचारीवर्ग असतो आणि कैदी कल्याणासाठी नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारीवरच्या अधिकाऱ्यांची संख्याही अपुरी असते. विविध समस्यांवर उपाय काढण्यासाठी अभ्यागत मंडळाच्या (यामध्ये बिगरसरकारी संघटनांचे सदस्य असतात) नियमित बैठका घेण्याचा

नियमही सहज मोडला जातो, कारण दंडात्मक कारवाईची कोणतीही भीतीच नसते. प्रश्न वा समस्या निर्माण झाल्या तरी तुरुंगाधिकारी व पोलीस यांच्याविरोधात क्वचितच तपासप्रक्रिया केली जाते.

शेट्टे यांच्या निष्ठुर हत्येचा तपास करून दोषींना शिक्षा व्हायला हवी. प्रसारमाध्यमं, नागरी समाज व न्यायव्यवस्था यांनी कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्यांना उत्तरदायी ठेवलं पाहिजे. न्यायमूर्ती कृष्ण अय्यर यांनी त्यांच्या एका निकालपत्रात (सुनील बात्रा विरुद्ध दिल्ली प्रशासन आणि इतर, १९७८) म्हटल्यानुसार : गजाआडचं स्वातंत्र्य हा आपल्या घटनात्मक कराराचा भाग आहे... युद्धाची जबाबदारी केवळ सेनापतींवर सोडून चालत नाही, त्याचप्रमाणे कैद्यांचे मूल्यवान अधिकारही केवळ तुरुंगाधिकाऱ्यांच्या जबाबदारीवर सोडणं पुरेसं नाही. ●

---

## आज्ञाधारक भावी राष्ट्रपती ?

*रामनाथ कोविंद यांची राष्ट्रपतीपदी निवड झाल्यास केंद्रीकरणाच्या वृत्तींना आणखी बळकटी प्राप्त होईल.*

भारताच्या राष्ट्रपतीपदासाठी भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं (रालोआ) रामनाथ कोविंद यांची उमेदवारी जाहीर केली आहे. एकीकडं सत्तेच्या व्यापक केंद्रीकरणाची तजवीज करणाऱ्या सत्ताधारी पक्षाला आपण दलितांचे हितसंबंध जपत असल्याचा कांगावा करण्याची संधी यातून मिळाली. राष्ट्रपतीपदासाठी १७ जुलै रोजी होणाऱ्या या निवडणुकीचा निकाल जवळपास नक्की झाला आहे. रालोआबाहेरच्या बिजू जनता दल, जनता दल (संयुक्त), आणि तेलंगण राष्ट्र समिती इत्यादींसारख्या पक्षांनीही कोविंद यांच्या नावाला आधीच समर्थन जाहीर केल्यामुळं एकूण मतांपैकी ५५ टक्के मतं त्यांना मिळणं अपेक्षित आहे, म्हणजे प्रणव मुखर्जी यांच्यानंतर राष्ट्रपतीपदावर त्यांची वर्णी लागेल. राष्ट्रपतीपदाचा उमेदवार जाहीर करताना रालोआ आणि भाजपचे अध्यक्ष अमित शहा यांनी कोविंद यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचं वर्णन करताना म्हटलं होतं की, कोविंद यांनी 'गरीब दलित कुटुंबात जन्मल्यानंतर कष्टानं प्रगती साधली आहे'. कोविंद यांच्या दलित असण्याचा मुद्दा पृष्ठभूमीवर आणल्यामुळं त्याकडं साहजिकपणे मोठ्या प्रमाणात लक्ष वेधलं गेलं. परिणामी, कोविंद यांची उमेदवारी जाहीर झाल्यावर काही दिवसांमध्येच बहुतांश विरोधकांच्या बाजूनं मीरा कुमार यांचं नाव जाहीर करण्यात आलं. तत्पूर्वी गोपाळकृष्ण गांधी यांना राष्ट्रपतीपदाचा उमेदवार बनण्यासाठी विनंती करावी, असा विचार विरोधक अडखळत करत होते. राज्यसंस्थेच्या प्रमुखपदासाठी दलित पुरुषाविरोधात दलित स्त्री उभी करण्यामध्ये काँग्रेसनं स्वतःच्या मनानं निर्णय घेतल्याचं दिसतं आहे.

उमेदवारी जाहीर होणं आणि त्यानंतरच्या घटनाक्रमामध्ये विविध घटक सक्रिय असल्याचं दिसलं. गेल्या काही काळात अनेक जातीसंबंधित घटनांमध्ये निष्क्रियता दाखवल्याबद्दल नरेंद्र मोदी सरकारवर टीका झालेली आहे. हैदराबाद विद्यापीठातील विद्यार्थी रोहीत वेमुला याचा अनैसर्गिक मृत्यू, गुजरातमध्ये उना इथं गोरक्षकांनी चार दलित पुरुषांवर केलेला अत्याचार आणि उत्तर प्रदेशात सहराणपूर इथं दलितांवर झालेले अनेक हल्ले- अशा अनेक घटना या संदर्भात नोंदवता येतील. या घटनांना भाजपनं दिलेल्या चुकीच्या प्रतिक्रियांवर पांघरूण घालण्याचा करुण प्रयत्न म्हणून कोविंद यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

शिवाय, भाजप व संघ परिवाराच्या अनेक दीर्घकालीन प्रकल्पांसाठीही ही उमेदवारी पूरक ठरणारी आहे. दलितांच्या आत्मविश्वासाचं न-राजकीयीकरण करणं आणि त्यांना संघाच्या हिंदू धर्माविषयक एककल्ली साचेबंद संकल्पनेमध्ये सामावून घेण्याचा हा प्रकल्प आहे. या संकल्पनेत सूक्ष्मरित्या ब्राह्मण्य, जातिव्यवस्था यांची पाठराखण होते आणि अल्पसंख्यांकांच्या विरोधात विखारही यात समाविष्ट आहे. आंबेडकरांच्या वारशाचा अपहार करणं; उत्तर भारतातील दलितांमध्ये आणि इतर मागासवर्गीयांमध्येही विभाजन करत इतर पक्षांपासून त्यांना दूर खेचणं- हेही या प्रकल्पाचे घटक आहेत. कोविंद यांच्या उमेदवारीमुळं विरोधकांमधील भेदही प्रकाशात आले आणि रालोआनं उमेदवार जाहीर केल्यानंतरच विरोधकांनी त्यावरची प्रतिक्रिया दिल्यामुळं त्यांची प्रभावहीन राजकीय व्यूहरचनाही उघड झाली. कोविंद यांच्या उमेदवारीचा संदर्भ अस्मितेच्या राजकारणाशी आणि भाजपच्या संधिसाधू राजकीय क्लृप्त्यांशी असल्याचं भाष्य अनेकांनी केलं आहे, परंतु त्यांच्या अपेक्षित विजयाचे दीर्घकालीन परिणामही लक्षात घेणं तितकंच महत्त्वाचं आहे.

जनता पक्षाचा १९७७च्या निवडणुकांमध्ये विजय झाल्यानंतर तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांचे स्वीय सचिव म्हणून कोविंद यांनी काम पाहिलं होतं. १९८० साली इंदिरा गांधी सत्तेत परत आल्यानंतर सर्वोच्च न्यायालयातील केंद्र सरकारचे स्थायी वकील म्हणून त्यांची नियुक्ती कायम ठेवण्यात आली. भाजपमध्ये भरती होणाऱ्या सुरुवातीच्या दलितांपैकी एक (त्यांनी १९९१ साली पक्षात प्रवेश केला) असलेल्या कोविंद यांनी पक्षात अनेक महत्त्वाची पदं सांभाळली आहेत : भाजपच्या उत्तर प्रदेश शाखेचे संयुक्त सचिव, अनुसूचित जाती मोर्चाचे अध्यक्ष आणि राष्ट्रीय प्रवक्ता, ही त्यांची काही पूर्वाश्रमीची पदं होत. उत्तर प्रदेशातून त्यांनी १९९१ साली लोकसभेची निवडणूक लढवली होती आणि त्यात त्यांचा पराभव झाला. राज्यातील तथाकथित ठाकूर दबावगटांशी त्यांचं सख्य नव्हतं, असं सांगितलं जातं. भाजपनं त्यांना १९९४ आणि २००६ अशा दोन वेळी राज्यसभेवर पाठवलं. या काळात त्यांनी विविध संसदीय समित्यांवर काम केलं. अटल बिहारी वाजपेयी सरकारच्या काळात त्यांनी संयुक्त राष्ट्रांमध्ये भारताचं प्रतिनिधित्व केलं. २०१५ साली बिहारच्या राज्यपालपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली.

भारतात विविध प्रकारचे राष्ट्रपती होऊन गेलेले आहेत. आणीबाणी लादून राज्यघटना तात्पुरती निलंबित करण्याचा इंदिरा गांधींचा निर्णय मान्य करणाऱ्या फख़रुद्दीन अली अहमद यांची राष्ट्रपतीपदाची कारकीर्द या घटनेनं कुप्रसिद्ध बनली. सुरुवातीला आज्ञाधारक वाटणारे पण नंतर राजीव गांधींना अनेक प्रसंगी विरोध केलेले ग्यानी झैल सिंग यांनी एकदा तर सरकारी टेहळणीच्या मुद्द्यावरून राजीव यांना पदच्युत करण्याची नाट्यमय धमकीही दिली होती. अलीकडच्या काळात के. आर. नारायणन यांनी स्वतंत्र भारताच्या अपयशांसंबंधीचं आकलन मांडून राज्यघटनेमधील आंबेडकरांच्या योगदानाचं महत्त्वही अधोरेखित केलं होतं. नारायणन यांची ही मांडणी तत्कालीन वाजपेयी सरकारच्या अनेक मतांना छेद देणारी होती. अलीकडचे दोन माजी राष्ट्रपती- प्रतिभा देवीसिंग पाटील आणि प्रणव मुखर्जी यांची कामाची शैली व राजकीय पार्श्वभूमी भिन्न असली तरी त्यांनी सरकारच्या विरोधात कधीही भूमिका घेतली नाही. मुखर्जी यांनी क्वचित प्रसंगी इहवाद व स्वातंत्र्य यांवर टिप्पणी केली असली, तरी सरकारच्या प्रत्येक आदेशाला आणि वादग्रस्त मानल्या गेलेल्या अनेक वटहुकुमांना त्यांनी सहमती दर्शवली. यामध्ये

भूसंपादन कायद्यात सुधारणा करण्यासंबंधीच्या वटहुकुमाचाही समावेश आहे.

रायसिना हिलमध्ये सत्तेची सूत्रं घेऊन बसलेल्यांच्या हितसंबंधांना अंधपणे स्वीकारण्याइतके कोविंद आज्ञाधारक राहातील का? या प्रश्नाचं उत्तर येत्या काळात मिळेलच, परंतु त्यांचं राजकारण विद्यमान सरकारपेक्षा फारसं भिन्न असेल असं मानण्याचं कोणतंच कारण दिसत नाही. या पार्श्वभूमीवर कोविंद यांचा जगातील 'सर्वांत मोठ्या निवासगृहा'त होणारा प्रवेश पाहावा लागेल (३२० एकरांवर पसरलेल्या आणि ३४० खोल्या असलेल्या राष्ट्रपती भवनाचं वर्णन अनेकदा अशा प्रकारचं 'जगातील सर्वांत मोठं निवासगृह' असं केलं जातं). आत्तापर्यंत त्यांनी आक्रमक लढवय्याची भूमिका निभावल्याचं ज्ञात नाही. मोदी सरकारला लोकशाहीच्या संस्थात्मक रचनेबद्दल फारशी आस्था नाही. पंतप्रधानांनी एकनिष्ठ आणि आज्ञाधारकांना दिलेलं प्राधान्य आश्चर्यकारक नाही. सरकारनं अलीकडं केलेल्या काही नियुक्त्याही हेच स्पष्ट करणाऱ्या आहेत.

कोविंद कशा प्रकारचे राष्ट्रपती असतील? निवडणूक प्रचारमोहिमेवेळी केलेल्या काही विधानांवरून त्यांची राज्यघटनेबाबतची भूमिका सूचित होते. राष्ट्रपतींच्या दृष्टीनं राज्यघटना सर्वोच्च असते. तीच गीता, रामायण, कुराण व बायबल असते, असं कोविंद म्हणाले होते. त्यांनी धार्मिक संहितांचा दिलेला दाखला चिंताजनक आहे. राज्यघटना ही देवानं निर्माण केलेली नाही. नैतिकता, न्याय, स्वातंत्र्य, समता व मानवाधिकार या तत्त्वांवर आधारलेला तो जिवंत दस्तावेज आहे आणि प्रजासत्ताक लोकशाहीमध्ये या दस्तावेजावर सतत वाटाघाटी व मांडणी होत असतात. कोविंद यांनी लोकशाहीतील राज्यघटनेचं स्थान सांगताना वापरलेल्या उपमेमुळं बहुसंख्याकवादाचं समर्थन करणाऱ्या राष्ट्रराज्याला मान्यता दिली जाते आहे का? सत्तेचं केंद्रीकरण करणाऱ्या लोकशाहीविरोधी वृत्तींना प्रतिकार करण्याची क्षमता वा इच्छा कोविंद यांच्याकडं असेल, असं त्यांच्या आत्तापर्यंतच्या कारकिर्दीवरून तरी वाटत नाही.●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे.
(२४ जून व ८ जुलैच्या अंकांतून)

## गोरक्षणाच्या नावाखाली केल्या जात असलेल्या हत्यांचा तीव्र निषेध

देशभर गोरक्षणाच्या नावाखाली सर्वसामान्य दलित आणि मुस्लिम व्यक्तींना क्रूरपणे मारले जात आहे. अखलाक, पेहलू खान, जुनैद, ऐनूल अन्सारी, जाहिद भट्ट, जफर हुसेन, अबु हनिफा अशी ही नावांची यादी दिवसेंदिवस वाढतेच आहे. 'मार्क्सवाद फुले आंबेडकरवाद समन्वय समिती' तिच्या संलग्न जनसंघटनांसह या हत्यांचा तीव्र निषेध करते.

स्वातंत्र्योत्तर भारतातील सर्वात मोठे अरिष्ट व आव्हान आपल्यासमोर उभे ठाकले आहे. या अरिष्टामुळे पुरोगामी पक्ष, संघटनांचे अस्तित्व आणि अवकाश यांच्यासमोरही गंभीर संकट निर्माण झाले आहे. दाभोळकर, कॉ. पानसरे, कलबुर्गी यांच्या हत्या करून प्रतिगामी शक्ती मोकाट सुटल्या आहेत. या महासंकटाचा मुकाबला करण्यासाठी परिवर्तनवादी शक्तींना वैचारिक व कार्यक्रमात्मक मतभेद बाजूला सारून एकत्र यावे लागेल.

**मार्क्सवाद फुले आंबेडकरवाद समन्वय समिती**

क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी, **सत्यशोधक** विद्यार्थी संघटना / शिक्षक सभा / घरेलू कामगार संघटना / जनआंदोलन